दिन विशेष...

१७३६ : चिमाजीआप्पांनी मोघल बादशहाचा हस्तक जंजिरा येथील सिद्दीसाताचा पराभव करुन मराठी सत्तेचा दरारा बसविला.
१७७२ : अहमदशहा अब्दालीचा मृत्यू.
१८९१ : डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती.
१९६५ : अमेरिकेचे अध्यक्ष अब्राहम लिंकन यांची हत्या.

महाराष्ट्राचे निडर दैनिक

# शौर्य मराठी

RNI-MAHMAR/2023/89125

सेन्सेक्स ७६,८४७.५७ -७०२.६८ (०.९१%)
डॉलर ₹ ९३.३९

आजचे तापमान (डिग्री सेल्सिअस)

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| जळगाव | ४१ | २३ |
| दिल्ली | ३६ | २२ |
| मुंबई | ३६ | २५ |
| नागपूर | ४१ | २३ |
| पुणे | ३९ | १९ |

epaper.shauryamarathi.com | जळगाव, धुळे, नंदुरबार | मंगळवार, दि. १४ एप्रिल २०२६ | वर्ष २ रे | अंक १५३ किंमत : ५ रु. | पाने ४




आज डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती

## सुविचार

आपल्या आयुष्यातील प्रेम आणि मैत्रीला महत्त्व द्या. हे दोन्ही आपल्या आयुष्याला समृद्ध आणि पूर्ण करतात.

सूर्योदय - सूर्यास्त
स.-६:१० संध्या-६:४६

सोने – चांदी
सोने(१० ग्रॅम) - चांदी (प्रति किलो)
१,५३,८४०/- २,५५,०००/-

# महिलांच्या सहभागामुळे लोकशाही होईल मजबूत

## ‘नारी शक्ती वंदन अभियाना’विषयी पंतप्रधानांचा आशावाद

वृत्तसंस्था । दिल्ली

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिल्लीतील ‘नारी शक्ती वंदन अभियान’ कार्यक्रमात महिलांचा राजकीय सहभाग बळकट करण्याच्या गरजेवर भर दिला. त्यासोबतच अनेक दशकांपासूनची प्रतीक्षा संपवण्याची वेळ आली आहे, असे सांगितले. या दिशेने १६, १७ आणि १८ एप्रिल या तारखा निर्णायक ठरतील, असे त्यांनी नमूद केले.**




पंतप्रधानांनी या कार्यक्रमात बोलताना, ‘२०२३ मध्ये नवीन संसद भवनात ‘नारी शक्ती वंदन कायद्या’च्या रूपात पहिले पाऊल उचलण्यात आले होते. देशाच्या लोकशाही व्यवस्थेत महिलांचा सहभाग अधिक बळकट करणे, हा त्याचा उद्देश आहे’. असे त्यांनी म्हटले.

त्यांनी पुढे सांगितले की, ‘हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून, १६ एप्रिलपासून सुरू होणाऱ्या संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनादरम्यान एक विशेष अधिवेशन आयोजित केले जात आहे.

या अधिवेशनात महिलांना अधिक प्रतिनिधित्व मिळवून देण्यासाठी ठोस पावले उचलली जातील. पंतप्रधान मोदी यांनी यावेळी, ‘नारी शक्ती वंदन’ कार्यक्रमाला देशभरातील लाखो माता आणि भगिनींचे आशीर्वाद मिळत आहेत, ज्यामुळे हा उपक्रम आणखी मजबूत होईल’. असेही सांगितले.

महिलांच्या सहभागामुळे आपली लोकशाही अधिक मजबूत होईल; ‘नारी शक्ती वंदन अभियानाविषयी पंतप्रधानांची प्रतिक्रिया तर दुसरीकडे काँग्रेस संसदीय पक्षाच्या अध्यक्षा सोनिया गांधी यांनी आज,‘संसदेच्या या आठवड्यातील विशेष अधिवेशनात विधेयक आणण्यामागे सरकारचा खरा मुद्दा महिला आरक्षण नसून मतदारसंघ पुनर्रचना आहे’. असे म्हणत केंद्राच्या हेतुंवर प्रश्नचिन्ह उपस्थित केला आहे.तसेच सोनिया गांधी यांनी, ‘मतदारसंघ पुनर्रचनेचा प्रस्ताव अत्यंत धोकादायक असून तो संविधानावरील हल्ला आहे, असा दावा केला आहे. त्यांनी यावरही जोर दिला की, ‘लोकसभेतील जागांची संख्या वाढवणारी कोणतीही मतदारसंघ पुनर्रचना केवळ गणितानुसारच नव्हे, तर राजकीयदृष्ट्याही योग्य ठरवली पाहिजे‘. असे त्यांनी म्हटले

# इस्त्रायलचा ‘महात्मा गांधी हॉस्पिटल’वर हल्ला

### सर्वकाही उद्ध्वस्त, इराणने शेअर केला व्हिडिओ

वृत्तसंस्था । तेहरान

**इराणने अमेरिकेसह इस्रायलवर तीव्र टीका करत सुरू असलेल्या संघर्षात नागरिकांच्या पायाभूत सुविधांवर लक्ष्य केल्याचा गंभीर आरोप केला आहे. अमेरिकन–इस्रायली हवाई हल्ल्यांमध्ये इराणमधील ६०० हून अधिक रुग्णालये आणि ६० हून अधिक शाळांवर हल्ले झाल्याचा दावा इराणकडून करण्यात आला आहे.भारतातील इराणी दूतावासाने सोशल मीडियावर एक व्हिडिओ शेअर करत तेहरानमधील महत्मा गांधी हॉस्पिटलवरील नुकसानीचे दृश्य दाखवले आहे. मुलांसाठी असलेल्या या रुग्णालयाच्या इमारतीला हवाई हल्ल्यांमध्ये मोठे नुकसान झाल्याचे या व्हिडिओत दिसते.**

या घटनेची पुष्टी जागतिक आरोग्य संघटनेने देखील केली आहे.हा हल्ला अमेरिकन–इस्रायली संयुक्त लष्करी मोहिमेच्या दुसऱ्या दिवशी झाला. ही मोहीम २८ फेब्रुवारीपासून सुरू झाली असून, त्याआधीच्या हल्ल्यांमध्ये इराणचे सर्वोच्च नेते अली खामेनेई यांच्या मृत्यूनंतर परिस्थिती अधिक तणावपूर्ण झाली आहे.

व्हिडिओमधील निवेदकाच्या म्हणण्यानुसार, इराणने सुरू असलेल्या युद्धात ११ देशांवर हल्ले केले असले तरी त्यांनी कधीही रुग्णालये किंवा मुलांना लक्ष्य केले नाही. उलट अमेरिकन–इस्रायली कारवाईत मोठ्या प्रमाणावर नागरी ठिकाणांचे नुकसान झाल्याचा आरोप करण्यात आला आहे.२ मार्च रोजी उत्तर तेहरानमधील महात्मा गांधी (पान २ वर)

## थोडक्यात

### चर्चा फिस्कटल्यानंतर ट्रम्प ॲक्शन मोडमध्ये

**वॉशिंग्टन ।** इस्लामाबादमध्ये अमेरिका आणि इराण यांच्यात झालेल्या अयशस्वी चर्चेनंतर आता डोनाल्ड ट्रम्प यांनी कठोर पावलं उचलायला सुरुवात केली आहे. आजपासून इराणच्या बंदरांची नाकेबंदी करण्यास सुरुवात होणार असल्याचे युएस सेंट्रल कमांडने म्हटले आहे. इराणची बंदरे, किनारी भागात प्रवेश करणाऱ्या किंवा तिथून बाहेर पडणाऱ्या सर्व देशांच्या जहाजांविरोधात ही नाकेबंदी असणार असल्याचेही सेंटकॉमकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

# कार–सिमेंट मिक्सर ट्रकची समोरासमोर धडक

वृत्तसंस्था । अहिल्यानगर

**कल्याण–अहिल्यानगर महामार्गावर एका ईको कार आणि सिमेंट मिक्सर ट्रकची समोरासमोर धडक होऊन भीषण अपघात झाला आहे. या भीषण अपघातात ११ प्रवाशांचा जागीच मृत्यू झाला आहे. तर एक जण गंभीर जखमी झाला असून त्याची प्रकृती चिंताजनक असल्याचे समोर आले आहे.**





## भीषण अपघातात ११ जणांचा मृत्यू

पोलिसांनी अपघातग्रस्त वाहने तात्काळ बाजूला करून वाहतूक सुरळीत केली आहे. जखमींनी उपचारासाठी रूग्णालयात दाखल केले. त्यानंतर ८ जणांचे मृतदेह सरकारी रूग्णालयात पोस्टमार्टमसाठी पाठवण्यात आले आहेत.

अपघाताचा आवाज होताच परिसरातील स्थानिक नागरिकांनी तातडीने मदतीसाठी धाव घेतली. या घटनेची माहिती मिळताच महामार्ग पोलीस आणि स्थानिक पोलीस प्रशासनही घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी स्थानिक नागरिकांच्या मदतीने कारमध्ये अडकलेल्या मृतदेहांना आणि जखमीला बाहेर काढले.

सध्या मृतांची ओळख पटवण्याचे काम पोलिसांकडून सुरू आहे.

पोलिसांनी या प्रकरणी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू केला आहे. अपघात नेमका कसा झाला? नेमकं काय घडलं, याची माहिती पोलिसांकडून केले जात आहे.

# स्वरसम्राज्ञी आशा भोसले अनंतात विलीन



## साश्रू नयनांनी दिला अखेरचा निरोप

वृत्तसंस्था । मुंबई

**स्वरसम्राज्ञी आशा भोसले अनंतात विलीन झाल्या आहेत. मुंबईतील शिवाजी पार्कमधील स्मशानभूमीत त्यांच्यावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी वेगवेगळ्या क्षेत्रातील दिग्गज आणि प्रतिष्ठित व्यक्ती उपस्थित होत्या.**

ज्येष्ठ गायिका स्वरसम्राज्ञी आशा भोसले अनंतात विलीन झाल्या आहेत. मुंबईतील शिवाजी पार्क येथील स्मशानभूमीत त्यांच्यावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, दोन्ही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे,(पान २ वर)

### शासकीय इतमामात अंत्यसंस्कार

आशा भोसले यांचे १२ एप्रिल रोजी दु:खद निधन झाले. हे वृत्त समोर येताच सर्वच स्तरातून हळहळ व्यक्त करण्यात आली. आज शिवाजी पार्कमधील स्मशानभूमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्याआधी लोअर परळ येथील निवासस्थानी आशाताईंचे पार्थिव अंत्यदर्शनासाठी ठेवण्यात आले. त्यानंतर अंत्ययात्रेदरम्यान हजारो लोकांनी आशाताईंचे अखेरचे दर्शन घेतले. शिवाजी पार्कमधील स्मशानभूमीत मुख्यमंत्री तसेच दोन्ही उपमुख्यमंत्री आणि इतर राजकीय नेत्यांनी आशाताईंना पुष्पांजली अर्पण केली. त्यानंतर त्यांच्यावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले.



# वैतरणा धरण–दुगारवाडी धबधब्यात पाचोरा, बुलढाणा, नाशिकचे ४ तरुण बुडाले

वृत्तसंस्था । नाशिक

**येथील वैतरणा धरण आणि वावी हर्ष येथील दुगारवाडी धबधबा परिसरात दोन वेगवेगळ्या घटनांमध्ये चार युवक बुडाल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. या दुर्घटनांमध्ये दोन जणांना सुखरूप वाचवण्यात पोलिसांना यश आले. बुडालेल्या युवकांमध्ये पाचोरा, बुलढाण्यासह नाशिकमधील चार युवकांचा समावेश आहे.**



जिल्हा आपत्ती व्यवस्थापन कक्षाकडून याबाबतची माहिती देण्यात आली. रविवारी सायंकाळी या दोन्ही घटना घडल्याचे सांगितले जाते. मिळालेल्या माहितीनुसार, वैतरणा धरणालगत असलेल्या झारवड परिसरात बेटावर दोन मित्र पाण्यात उतरले होते. मात्र, पाण्याच्या प्रवाहाचा आणि खोलीचा अचूक अंदाज न आल्याने एक जण वाहून जाऊ लागला. त्याला वाचवण्याच्या प्रयत्नात दुसराही युवक पाण्यात बुडाला. या दुर्दैवी घटनेत दोन्ही युवक बुडाले. आदित्य प्रमोद वानरे (वय २०, रा. नांदुरा, जि. बुलढाणा) आणि विरेंद्र नंदन पाटील (वय २०, रा. पाचोरा, जि. जळगाव) अशी या युवकांची नावे आहेत. स्थानिक नागरिकांच्या मदतीने प्रशासन व पोलिसांनी तातडीने शोधकार्य सुरू केले. परंतु, रात्री उशिरापर्यंत त्यांचा शोध लागू शकला नव्हता, असे आपत्ती व्यवस्थापन कक्षाने म्हटले आहे.

दुसरी घटना वैतरणा धरणाच्या पाठीमागील वावी हर्ष दुगारवाडी धबधब्यावर घडली. येथेही दोन युवक पाण्यात बुडाल्याची घटना समोर आली आहे. या घटनेत बुडालेल्या युवकांमध्ये मनिष दिलीप चव्हाण (२१) आणि अथर्व गोसावी (२२, दोघेही रा. नाशिक) यांचा समावेश आहे. त्यांच्यासोबतच्या मित्रांनी बुडालेल्या मुलांचा शोध (पान २ वर)

**वैतरणा धरण परिसरात धरणाच्या बेटावर गेलेल्या काही तरुणांना पाण्याची खोली वाढल्याचा अंदाज न आल्याने ते बुडाल्याची माहितीही समोर येत आहे. उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर, अंघोळीसाठी आलेल्या या तरुणांना परिस्थितीचा योग्य अंदाज न आल्याने या दुर्दैवी घटना घडल्याचे बोलले जात आहे. या घटनेची माहिती मिळताच घोटी पोलीस ठाण्याचे पथक घटनास्थळी दाखल झाले.**

# अकोला देशातील सर्वाधिक उष्ण शहर

## ४३.१ अंश तापमानाची रविवारी झाली नोंद, नागरिक उकाड्याने त्रस्त

वृत्तसंस्था । नागपूर

**राज्यात उष्णतेची लाट तीव्र होत असून रविवारी विदर्भातील अकोला हे शहर देशातील सर्वाधिक उष्ण शहर ठरले. अकोला शहरात रविवारी ४३.१ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद करण्यात आली.**

मधल्या काळात अवकाळी पाऊस आणि ढगाळ हवामानामुळे वातावरणात बराच बदल झाला होता. मात्र, आता ढगाळ वातावरण दूर होताच तीन दिवसात विदर्भातील तापमानाचा पारा पाच अंश सेल्सिअसने वाढला. रविवारी अकोला जिल्ह्याचे तापमान ४३.१ अंश सेल्सिअसपर्यंत पोहचले. त्यामुळे ते देशातील सर्वाधिक उष्ण शहर ठरले. अकोला पाठोपाठ अमरावती, वर्धा, वाशिम या शहरांतही पारा चांगलाच वाढला होता. ब्रम्हपुरी वगळता विदर्भातील सर्वच शहराने ४० अंश सेल्सिअस तापमान ओलांडले.




### किमान तापमानातही वाढ

अकोला शहरात शनिवारी देखील ४२ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद करण्यात आली होती. मागील तीन दिवसात तापमानात चार अंशांनी वाढ झाल्याने अकोल्यात उकाडा वाढला आहे. गुरुवारी ३८.७ अंशावर तापमान पोहोचले होते. पण शुक्रवारी या तापमानात वाढ होऊन ते ४०.१ अंशांवर पोहोचले. तर शनिवारी ४२ अंश तापमानाची नोंद करण्यात आली.अमरावती येथे रविवारी ४२.४ अंश तापमानासह दुसऱ्या क्रमांकाची नोंद झाली आहे. किमान तापमानातही बऱ्याच प्रमाणात वाढ झाली आहे. किमान तापमान देखील २७ अंशावर पोहचले आहे.

**तापमान वाढतेच राहणार**

हवामान खात्याने पुढील ८ ते १० दिवस वातावरण कोरडे व उष्णतेची लाट कायम राहण्याची शक्यता वर्तवली आहे. त्यामुळे तापमानाचा पारा चढताच राहणार असून उन्हाच्या झळा बसणार आहेत. मार्च महिन्यातच उन्हाच्या झळा जाणवू लागल्या होत्या, पण अवकाळी पावसाने हा पारा खाली आला. मात्र, आता पुन्हा एकदा तापमानाने उसळी घेतली आहे. तापमानात झपाट्याने वाढ होत असून आता हवामान खात्यानेही उष्णतेच्या लाटेचा इशारा दिला आहे. तीव्र उन्हामुळे (पान २ वर)

# सुरत–अमरावती एक्स्प्रेसचे आणखी पाच डबे वाढणार..?

### धरणगाव तालुका प्रवासी मंडळाच्या पाठपुराव्याला यश

प्रतिनिधी । जळगाव

**जिल्ह्यातील धरणगाव रेल्वे स्थानकाच्या सर्वांगीण विकासाला गती देण्यासह प्रवाशांच्या वाढत्या गरजांची पूर्तता करण्यासाठी पश्चिम रेल्वे मुख्यालयात नुकतीच महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. डीआरयूसीसी सदस्य (पश्चिम रेल्वे) तसेच धरणगाव तालुका प्रवासी मंडळाचे अध्यक्ष महेंद्र कोठारी यांनी खासदार स्मिताताई वाघ यांच्या मार्गदर्शनाखाली मुख्य वाणिज्य प्रबंधक स्वप्नील वालिंजकर तसेच विभागीय कार्यालयातील वाणिज्य व परिचालन विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांशी सविस्तर चर्चा केली.**



बैठकीत धरणगाव रेल्वे स्थानकाच्या (पान २ वर)

## संपादकीय

### अष्टपैलू सुरांचा अस्त

ज्येष्ठ गायिका आशा भोसले यांच्या निधनामुळे भारतीय संगीतसृष्टीतील एका अष्टपैलू सुराचा अस्त झाला आहे. गेली आठ दशके हिंदी, मराठी आणि अनेक भाषातील संगीत रसिकांना आपल्या अष्टपैलू आवाजाने आणि वैविध्यपूर्ण गायकीने रिझवणाऱ्या या ज्येष्ठ गायिकेच्या निधनामुळे भारतीय चित्रपट सृष्टीच्या संगीत क्षेत्रामध्ये खरोखरच एक कधीही न भरून येणारी पोकळी निर्माण झाली आहे. खरे तर मोठ्या वटवृक्षाच्या सावलीमध्ये छोटी झाडे कधीही उगवत नाहीत किंवा वाढत नाहीत असे म्हटले जाते. पण गानसरस्वती भारतरत्न लता मंगेशकर यांच्या धाकट्या भगिनी असलेल्या आशा भोसले यांनी ही म्हण खोटी करून दाखवली. लता मंगेशकर यांच्या एवढीच लोकप्रियता आशा भोसले यांनी आपल्या कारकिर्दीमध्ये मिळवली. किंबहुना सर्वसाधारण फॅन्सचा विचार करता अनेक वेळा लता मंगेशकर यांच्या पेक्षाही जास्त फॅन्सची संख्या आशा भोसले यांना लाभली होती. संपूर्ण मंगेशकर घराणेच गुणवत्तेने भरलेले आहे आणि या मंगेशकर भावंडांपैकी प्रत्येकाचे वैशिष्ट्य वेगळे आहे. लता मंगेशकर या तर गान सरस्वती होत्या. आशा भोसले यांनी जाणीवपूर्वक आपली वेगळी अशी शैली निर्माण केली होती. लता मंगेशकर सहसा ज्या प्रकारची गाणी गाऊ शकत नव्हत्या अशा उडत्या चालीच्या गाण्यांवर आशा भोसले यांनी जास्त मेहनत घेऊन त्यामध्ये आपली मक्तेदारी तयार केली होती. अर्थात, आपल्या या गायकीवरील हा शिक्काही त्यांनी काळाच्या ओघात पुसून टाकला होता. त्यांचे पती आरडी बर्मन यांच्या संगीत निर्देशनाखाली त्यांनी अत्यंत सुंदर अशी गाणीसुद्धा रसिकांना दिली आहेत. उडत्या चालींच्या गाण्याव्यतिरिक्त गझल, भावगीत, भक्तिगीत अशी अनेक प्रकारची गाणी आशा भोसले यांनी आपल्या कारकिर्दीमध्ये गायली. वैयक्तिक आयुष्याचा विचार करता आशा भोसले यांना जरी मोठ्या प्रमाणात संघर्ष करावा लागला तरी त्यांनी आपल्या गायन कारकिर्दीवर त्याचा कोणताही परिणाम होऊ दिला नाही. संगीत क्षेत्रातील सर्वच दिग्गजांसोबत त्यांचे चांगले संबंध होते. त्यामुळे लता मंगेशकर यांनी आयुष्यात कधीही ज्या ओ पी नय्यर यांच्यासारख्या संगीतकारांकडे गाणे गायले नाही त्याच नय्यर यांच्याकडे आशा भोसले यांनी अत्यंत सुंदर गाणी गायली. चित्रपट सृष्टीतील कोणताही संगीतकार आशा भोसले यांना नाकारत नव्हता. ङ्गउमराव जानफया चित्रपटामधील खय्याम यांच्या संगीत दिग्दर्शनाखाली गायलेली भोसले यांची गाणी म्हणजे त्यांच्या संगीत कारकिर्दीतील मानाचा तुरा आहे. याच गाण्यांसाठी त्यांना राष्ट्रीय पुरस्कारही मिळाला होता. ङ्गइजाजतफ सारख्या चित्रपटांमध्ये ङ्गमेरा कुछ सामान तुम्हारे पास पडा हैफ यासारखे अवघड गाणे गाऊन अशा भोसले यांनी एक अमीट ठसा उमटवला होता. अशी हजारो गाणी आजही रसिकांच्या तोंडी आहेत ज्यामध्ये आशा भोसले यांनी कधी रसिकांना डोलायला लावले, तर कधी गुणगुणायला लावले, तर कधी विचार करायला भाग पाडले आहे. त्यांच्यामध्ये गुणवत्ता ठासून भरली असल्याने चांगला संगीतकार मिळाला की त्यांच्यातील ही गुणवत्ता बाहेर येत असे आणि एक अत्यंत लँडमार्क असे गाणे तयार होत असे. वैयक्तिक आयुष्यामध्येही त्या सर्व अनुभव घेत जगल्या. माई नावाच्या एका चित्रपटामध्ये त्यांनी अभिनयही केला होता. दादासाहेब फाळके, पद्मविभूषण, महाराष्ट्र भूषण असे मोठे पुरस्कार मिळवूनही आशाताई शेवटपर्यंत जमिनीवरच राहिल्या. त्यांच्या अष्टपैलू गायकीसाठी संगीत क्षेत्रातही अनेक पुरस्कार त्यांना देण्यात आले. १९७० च्या दशकामध्ये आशा भोसले यांनी गायलेले दम मारो दम हे गाणे आज इतक्या वर्षानंतरसुद्धा तेवढेच लोकप्रिय आहे. त्यांची अशी अनेक गाणी आहेत जी आजही रसिकांच्या मनात रुंजी घालत असतात. त्यांच्या निधनामुळे हा अष्टपैलू सूर जरी लयाला गेला असला तरी त्यांचा स्वर आकाशात कुठे ना कुठे सतत ऐकला जाईल. या अष्टपैलू गायिकेला आदरांजली.

# ओघाणी-बगदा रस्त्याला अनास्थेचे ग्रहण

## गरोदर माता, रुग्णांचे हाल, युवा क्रांती संघटना आक्रमक!

प्रतिनिधी । कोलवीमाळ

**स्वातंत्र्याचा अमृत काळ सुरू असतानाही अक्कलकुवा तालुक्यातील अतिदुर्गम भागातील ओघाणी ते बगदा या रस्त्याला प्रशासकीय अनास्थेचे ग्रहण लागले आहे. हा रस्ता आहे की खडकाळ माळरान, असा संतप्त सवाल आता विचारला जात आहे. या मार्गाच्या तातडीने दुरुस्तीसाठी युवा क्रांती नंदूरबार सामाजिक संघटनेने आक्रमक पवित्रा घेतला असून, येत्या ७ दिवसांत प्रत्यक्ष कामाला सुरुवात न झाल्यास तीव्र रस्ता रोको किंवा कार्यालय टाळेबंदी आंदोलन छेडण्याचा इशारा दिला आहे.**

गुरुवारी संघटनेच्या वतीने सा.बां. विभागाचे कार्यकारी उपअभियंता आणि तहसीलदार यांना या संदर्भात निवेदन देण्यात आले. ओघाणी ते बगदा हा मार्ग परिसरातील अनेक आदिवासी पाड्यांना जोडणारा मुख्य दुवा आहे. मात्र, रस्त्यावर पडलेले अणकुचीदार दगड आणि मोठमोठ्या खड्ड्यांमुळे येथून रुग्णवाहिका नेणेही अशक्य झाले आहे. विशेषतः गरोदर माता आणि गंभीर रुग्णांना वेळेवर उपचार मिळत नसल्याने त्यांचा जीव धोक्यात आला आहे. शालेय विद्यार्थ्यांनाही दररोज जीव मुठीत धरून हा प्रवास करावा लागत आहे. युवा क्रांती संघटनेचे जिल्हा कार्याध्यक्ष अ‍ॅड. रुपसिंग तडवी आणि तालुकाध्यक्ष धिरसिंग वसावे यांनी पदाधिकाऱ्यांसह सदर मार्गाची प्रत्यक्ष पाहणी केली असता रस्त्याची अवस्था अत्यंत भीषण असल्याचे निदर्शनास आले. शासनाकडून दरवर्षी रस्ते विकासासाठी मोठा निधी येतो, मग या रस्त्याबाबतच सार्वजनिक बांधकाम विभाग इतका उदासीन का, असा सवाल निवेदनाद्वारे उपस्थित करण्यात आला आहे.

पावसाळा तोंडावर असल्याने या रस्त्याचे काम तातडीने होणे गरजेचे आहे. रस्त्यावरील विखुरलेल्या खडीमुळे







दुचाकी घसरून अपघात होण्याचे प्रमाण वाढले आहे. जर वेळेत दुरुस्ती झाली नाही, तर पावसाळ्यात या दुर्गम भागाचा जिल्ह्याशी असलेला संपर्क पूर्णपणे तुटण्याची भीती व्यक्त करण्यात आली आहे. निवेदन मिळाल्यापासून ७ कार्यदिवसांच्या आत कामाचे अंदाजपत्रक तयार करून प्रत्यक्ष काम सुरू करण्याचे लेखी आश्वासन संघटनेने मागितले आहे. अन्यथा होणाऱ्या आंदोलनामुळे उद्भवणाऱ्या परिस्थितीला सर्वस्वी प्रशासन जबाबदार राहील, असे युवक क्रांतीचे जिल्हा कार्याध्यक्ष अ‍ॅड. रुपसिंग तडवी व धिरसिंग वसावे यांनी निवेदनात स्पष्टपणे नमूद केले आहे. यावेळी सुनील वसावे व इतर कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# प्रभाग क्र.१४ मधील पाणीप्रश्न सोडविण्यासाठी नगरसेविका सुवर्णा हटकर यांचे युद्धपातळीवर प्रयत्न

प्रतिनिधी । अमळनेर

**नागरी समस्यांची जाण असलेल्या नगरसेविका सुवर्णा तुळशीराम हटकर आणि सामाजिक कार्यकर्ते तुळशीराम हटकर यांनी विकासकामांसाठी पुढाकार घेतला आहे. अमळनेर शहरातील प्रभाग क्रमांक १४ मधील पाण्याच्या समस्येबाबत हटकर दाम्पत्यांनी जातीने लक्ष घालण्यास सुरुवात केली आहे. या भागात होणाऱ्या अनियमित पाणीपुरवठ्यामुळे नागरीक त्रस्त होते. हटकर यांच्या प्रयत्नांनी या भागातील पाण्याचा प्रश्न लवकरच मार्गी लावण्याच्या दृष्टीने प्रभागात कामाला सुरुवात झाली आहे.**

अमळनेर शहरातील प्रभाग क्रमांक १४ मध्ये गेल्या काही दिवसांपासून नागरीकांना पाण्याची समस्या भेडसावत आहे. या भागात निर्धारित वेळत पाणीपुरवठा न होता अनियमित पाणीपुरवठा होत आहे. परिणामी नागरीकांना समस्यांना सामोरे जावे लागत आहे. ही समस्या लक्षात घेता नगरसेविका सुवर्णा हटकर व सामाजिक



कार्यकर्ते तुळशीराम हटकर यांनी पुढाकार घेत नगरपालिका पाणीपुरवठा विभागाकडे पाठपुरावा करुन या भागातील पाईपलाईन दुरुस्तीच्या कामाला मंजुरी मिळवून प्रत्यक्ष कामाला सुरुवात केली आहे.

सध्या युद्धपातळीवर या भागातील पाईपलाईनचे काम सुरु असून सामाजिक कार्यकर्ते तुळशीराम हटकर हे स्वत: थांबून काम करुन घेत आहे. तुळशीराम हटकर यांच्या या कार्यतत्परतेमुळे प्रभाग क्रमांक १४ मधील पाण्याचा प्रश्न लवकरच सुटणार असल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

# ५००० हॉकर्ससाठी मनसेचा लढा उभारण्याचा निर्धार

प्रतिनिधी । जळगाव

**शहरातील हॉकर्सच्या विविध समस्यांवर तोडगा काढण्यासाठी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेतर्फे पद्मालय विश्रामगृह येथे बैठक आयोजित केली होती. या बैठकीत मनसे पदाधिकारी व नगरपथविक्रेता समिती सदस्यांनी एकत्र येत जळगाव शहरातील सुमारे ५००० हॉकर्स बांधवांच्या हक्कांसाठी ठोस लढा उभारण्याचा निर्धार व्यक्त केला.**

या बैठकीत महापालिका अतिक्रमण विभागाकडून होत असलेल्या मनमानी व दादागिरीविरोधात तीव्र संताप व्यक्त करण्यात आला. हॉकर्स बांधवांवर अन्यायकारक कारवाई होत असल्याच्या अनेक तक्रारी समोर आल्या असून, या कारवायांमुळे त्यांच्या उपजीविकेवर गंभीर परिणाम होत असल्याचे स्पष्ट झाले. या प्रसंगी अतिक्रमण विभागाची कार्यपद्धती, फेरीवाला



समितीने सुचवलेल्या मार्गदर्शक सूचना, शहरात अधिकृत हॉकर्स झोन निश्चित करण्याची गरज, तसेच हॉकर्स बांधवांना सन्मानाने वागणूक देण्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. हॉकर्सना कायदेशीर संरक्षण मिळावे व त्यांच्या व्यवसायाला स्थैर्य मिळावे, यासाठी लवकरच ठोस कृती आराखडा महापालिकेसमोर मांडण्यात येणार असल्याचेही स्पष्ट करण्यात आले. यावेळी शहरातील हॉकर्स बांधवांच्या प्रश्नांबाबत प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी लवकरच मोठा मोर्चा आयोजित करण्याबाबतही महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. बैठकीस महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे जिल्हाध्यक्ष अ‍ॅड. जमील देशपांडे, महानगराध्यक्ष विनोद शिंदे, नगरपथविक्रेता समिती सदस्य मोहन तिवारी, विशाल पाटील, दिनेश हिंगणे, मनसेचे उपमहानगराध्यक्ष ललित शर्मा, चेतन पवार, आशुतोष जाधव, विभाग अध्यक्ष खुशाल ठाकूर, शेतकरी सेनेचे प्रदीप पाटील, शाखाध्यक्ष युसुफ खाटीक यांच्यासह हॉकर्स बांधव प्रतीक महाजन, लक्ष्मण दांडगे, विनोद पाटील, उमेश तळेले, विवेक महाजन, राजेश मराठे, संजय सोनार आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते. हॉकर्स बांधवांवर होणारा अन्याय यापुढे सहन केला जाणार नाही. त्यांच्या हक्कांसाठी महाराष्ट्र नवनिर्माण सेना रस्त्यावर उतरून लढा देईल,असा निर्धार करण्यात आला.

## पान १ वरुन

### स्वरसम्राज्ञी आशा भोसले......

सुनेत्रा पवार, भाजपाचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण, आमदार आशिष शेलार, मनसेचे प्रमुख राज ठाकरे, मंत्री छगन भुजबळ, मंत्री संजय शिरसाट, मुंबईच्या महापौर रितू तावडे, तसेच राजकीय, सामाजिक, सिनेजगतातील दिग्गज व्यक्ती उपस्थित होत्या. आशा भोसले आज आपल्यात नसल्या तरी त्यांनी गायलेल्या हजारो गाण्यांच्या रुपात त्या कायम आपल्यातच राहतील, अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. गेल्या वर्षी अनेक जाहीर कार्यक्रमांना उपस्थिती - त्यांना अलौकिक स्वरांची देणगी लाभली होती. त्यांनी आपल्या कारकिर्दीत १२ हजारांपेक्षा जास्त गाणी गायली. मराठी, हिंदी, बंगाली अशा वेगवेगळ्या भाषांत त्यांनी गाणी गायली. आशाताई गेल्या वर्षीच अनेक जाहीर कार्यक्रमांना उपस्थित होत्या. वयाची नव्वदी पार करूनही खणखणीत आणि मधूर आवाजाने त्यांनी अनेक कार्यक्रमांत गाणी गायली. परंतु गेल्या काही दिवसांपासून त्या सार्वजनिक कार्यक्रमांपासून दूर होत्या.

### वैतरणा धरण-दुगारवाडी......

घेतला. या घटनेची माहिती मिळताच प्रशासकीय यंत्रणा व पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. दोन्ही घटनांमधील चारही मुलांचे शोधकार्य सोमवारी सकाळपासून पुन्हा सुरू करण्यात आले. दरम्यान, पोलीस निरीक्षक विजय शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली बचाव व शोधमोहीम राबवण्यात आली. स्थानिकांच्या मदतीने दोन जणांना पाण्यातून बाहेर काढण्यात यश आले असून त्यांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती आहे. रात्री अंधार पडल्यामुळे शोधकार्य थांबविण्यात आले असून पुढील शोधासाठी आपत्ती व्यवस्थापन पथक व गोताखोरांची मदत घेतली जाणार आहे. मागील वर्षी याच ठिकाणी अशाच प्रकारची दुर्घटना घडली होती. त्यामुळे या परिसरात सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. प्रशासनाने धरण व धबधबा परिसरात आवश्यक त्या सुरक्षा उपाययोजना कराव्यात, अशी मागणी स्थानिकांकडून केली जात आहे. उन्हाळ्याच्या दिवसांत धरणे, धबधबे व जलाशय परिसरात अंघोळीसाठी जाणाऱ्या नागरिकांनी अधिक सतर्क राहावे, असे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे.

### सुरत-अमरावती......

पायाभूत सुविधांचा विकास, गाड्यांच्या थांब्यांमध्ये वाढ, बंद पडलेल्या गाड्यांचे पुनरुज्जीवन तसेच प्रवासी सुरक्षेसंदर्भातील विविध मुद्द्यांवर सकारात्मक आणि व्यापक चर्चा झाली. धरणगाव हे व्यापारी तसेच शैक्षणिकदृष्ट्या महत्त्वाचे केंद्र असून, परिसरातील हजारो प्रवासी रोज रेल्वे सेवांवर अवलंबून असतात. मात्र, सध्या अनेक लांब पल्ल्याच्या तसेच महत्त्वाच्या गाड्यांना येथे थांबा नसल्याने प्रवाशांना भुसावळसह जळगाव किंवा इतर मोठ्या स्थानकांवर जाऊन प्रवास करावा लागतो. ही अडचण दूर करण्यासाठी ओखातिरुपती ही नव्याने सुरू होणारी नियमित सेवा, चेन्नईभगत की कोठी एक्स्प्रेस, कोयंबतूर -जयपूर स्पेशल, सूरत-छपरा स्पेशल तसेच उधना-हसनपूर स्पेशल या गाड्यांना धरणगाव स्थानकावर थांबा देण्याची ठोस मागणी करण्यात आली. लांब पल्ल्याच्या गाड्यांना थांबा मिळाल्यास दक्षिण, उत्तर व पश्चिम भारताशी धरणगावचा थेट संपर्क अधिक सक्षम होणार आहे.

### अकोला देशातील सर्वाधिक......

अकोल्यातील दैनंदिन जीवनावर परिणाम दिसून येत आहे. दुपारच्या सुमारास रस्त्यांवरील वर्दळ कमी झाली असून नागरिक शक्यतो घरातच राहणे पसंत करत आहेत. जवळपास सर्वच शहरांमध्ये सारखी स्थिती आहे. उष्णतेपासून बचाव करण्यासाठी नागरिक प्रयत्न करताना दिसून येत आहे. उन्हामुळे चक्कर येणे, उलट्या होणे, डोकेदुखी आणि अंगात ताप येणे ही उष्माघाताची प्रमुख लक्षणे दिसून येत आहेत. अशी लक्षणे दिसल्यास संबंधित व्यक्तीला तातडीने सावलीत न्यावे.शरीर थंड ठेवावे आणि गरज भासल्यास डॉक्टरांचा सल्ला घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### इस्त्रायलचा 'महात्मा गांधी......

हॉस्पिटलवर इस्त्रायलने हवाई हल्ला केला. इराणच्या वृत्तसंस्थेने या हल्ल्याला 'झायनिस्ट-अमेरिकन हवाई हल्ला' असे संबोधले आहे. 'फार्स' आणि 'मिझान' या वृत्तसंस्थांनीही रुग्णालयातील व्हिडिओ प्रसिद्ध केले असून, त्यामध्ये व्हीलचेअरजवळ पडलेला ढिगारा आणि उद्ध्वस्त झालेले मजले दिसत आहेत. गांधी स्ट्रीट परिसरातील दोन प्रत्यक्षदर्शींनीही रुग्णालयाचे मोठे नुकसान झाल्याची माहिती दिली आहे.

# सामाजिक कार्यकर्ते मुकुंद सपकाळे यांच्यावर प्राणघातक हल्ला करणाऱ्यांना अटक करा; प्रांताधिकाऱ्यांना निवेदन

प्रतिनिधी । अमळनेर

**जनक्रांती मोर्चाचे अध्यक्ष तथा ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते मुकुंदराव सपकाळे हे नेहमी सेवाभावी वृत्तीने सामाजिक कार्य करत असतात. गोरगरीब जनतेसाठी नेहमीच मेहनत घेतात अशा माणुसकी असलेल्या व्यक्तीवर दि. ११ एप्रिल रोजी दुचाकीवरून आलेल्या हल्लेखोरांनी जळगाव येथे भरदिवसा जिवघेणा हल्ला केला. कायदा सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी हल्लेखोरांवर कारवाई करून तात्काळ अटक**



**करा,अशा मागणीचे निवेदन अमळनेर प्रांत अधिकाऱ्यांना देण्यात आले.**

भारतीय दंड संहिता अंतर्गत खून करण्याच्या प्रयत्न कलम ३०७ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात यावा, अशा आशयाचे निवेदन अमळनेर प्रांताधिकाऱ्यांना देण्यात आले. या निवेदनावर प्रा. अशोक पवार, गौतम मोरे, प्रा.सुभाष पाटील, बन्सीलाल भागवत, अशोक बिऱ्हाडे, बाळासाहेब संदानशिव, अतुल डोळस, हदयनाथ मोरे, पुरुषोत्तम माळी, महादू बैसाणे, अरूण देशमुख, चंद्रकांत बिऱ्हाडे, आत्माराम अहिरे, समाधान मैराळे यांच्या सह्या आहेत.

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त शहरातील वाहतूक मार्गात तात्पुरता बदल

प्रतिनिधी । धुळे

**धुळे जिल्ह्यात दि.१४ एप्रिल, रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती मोठया उत्साहात साजरी करण्यात येणार आहे. त्यामुळे शहरातील वाहतूक मार्गात तात्पुरता बदल करण्यात आला आहे.**

धुळे शहरातील तसेच ग्रामीण भागातील नागरिक मोठया संख्येने सहभागी होवून डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळयाजवळ त्यांना अभिवादन करण्यासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा, जेल रोड येथे एकत्र येतात. कार्यक्रमांच्या वेळी याठिकाणी मार्गावर वाहतुकीची कोंडी होवू नये म्हणून खबरदाराचे उपाय म्हणून या मार्गावरील वाहतुक मार्गात बदल करण्यात येत असल्याची अधिसूचना पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांनी निर्गमित केले आहे. १४ रोजी सकाळी ६ ते १५ रोजी सकाळी ६ वाजेपर्यंत कमलाबाई हायस्कुल चौक ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा ते डॉ. आंबेडकर यांचा पुतळा, संतोषी माता मंदिर ते डॉ.आंबेडकर पुतळा, बसस्थानकवरील वाहतूक तात्पुरती बंद केली आहे.

# वरणगाव येथील २५ कोटींच्या पाणीपुरवठा योजनेचे काम अपूर्ण; ठेकेदाराला दिली पूर्ण रक्कम

## शिवसेनेतर्फे नगराध्यक्षसह मुख्याधिकारी रवींद्र सोनवणे यांची समिती नेमून चौकशीची जिल्हाधिकाऱ्यांकडे केली मागणी

प्रतिनिधी । वरणगाव

**येथील २५ कोटी रुपये खर्चाच्या पाणीपुरवठा योजनेचे शहरात पूर्ण काम झालेले नसताना चाळीस टक्के काम अपूर्ण असताना संबंधित ठेकेदाराला पूर्ण रकमेची देयके नगराध्यक्ष आणि मुख्याधिकारी रवींद्र सोनवणे यांनी दिल्याने तो ठेकेदार आता उर्वरित बाकी असलेले काम ४० टक्के काम पूर्ण करेल का? त्या संबंधित ठेकेदाराला पूर्ण बिले देण्याची कुठल्यास सभेची मंजुरी न घेता परस्पर पूर्ण बिले देण्याचा घाट का घालण्यात आला. या सर्व प्रकाराची समितीमार्फत चौकशी करण्यात यावी, अशी मागणी शिवसेनेचे नगरसेवक आणि शिवसेना पक्षातर्फे जिल्हाधिकारी यांना दि. १३ रोजी दोन स्वतंत्र निवेदने देऊन करण्यात आली.**




जिल्हाधिकारी रोहन घुगे यांना दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, वरणगाव नगरपरिषदेच्या पाणीपुरवठा योजना सुवर्ण जयंती नगररोथ्यान योजनेंतर्गत पाणीपुरवठा योजनेच्या माध्यमातून शहरात नवीन जलवाहिनी, नवीन पाण्याच्या टाक्या इत्यादी कामे कार्यान्वित करण्यात आलेली आहे. परंतु सदर योजनेचे काम साठ टक्के झाले असून उर्वरित चाळीस टक्के काम हे अपूर्ण अवस्थेत असताना देखील पूर्ण काम झालेले नाही आणि संबंधित ठेकेदार अरिहंत कन्स्ट्रक्शन प्रा.ली. या कंपनीला पूर्ण रकमेचा म्हणजे ५ कोटी ६२ लाख १० हजार दोनशे ६२ रुपयांची रक्कम ठेकेदाराला देण्यात आली. ही रक्कम मिळाल्यानंतर शहरात बाकी असलेले उर्वरित कामे हा ठेकेदार करेल का? तो पुन्हा वरणगावला येईल का? असे एक ना अनेक प्रश्न या माध्यमातून निर्माण होत आहे. विशेष म्हणजे तत्कालीन मुख्याधिकारी रवींद्र सोनवणे यांची ३१ मार्च रोजी बदली झाली आणि पदभार सोडल्यानंतर २ एप्रिल रोजी सोनवणे यांच्या स्वाक्षरीने अरिहंत कन्स्ट्रक्शन कंपनीला चेक देण्यात आला. याची चौकशी व्हावी, अशी मागणी करण्यात आली आहे.२५ कोटी रूपये योजनेच्या पाणी पुरवठा योजनेचे काम सध्या अपूर्ण स्थितीत असताना नगराध्यक्ष सुनील काळे आणि मुख्याधिकारी रवींद्र सोनवणे या दोघांनी संगनमताने नगरपरिषदेच्या कोणत्याही विषय समितीची किंवा सर्वसाधारण सभेची पूर्वमंजुरी न घेता, सदर ठेकेदाराला मोठी रक्कम (देयक) परस्पर अदा केली आहे. या सर्व प्रकाराची समिती नेमून चौकशी करण्यात यावी अशी मागणी तृप्ता महाजन, राजेंद्र चौधरी, विलास मुळे, भुसावळ विधानसभा प्रमुख संतोष माळी, तालुका समन्वयक सुरेश चौधरी यांनी जिल्हाहिकारी रोहन घुगे यांना निवेदन देऊन चौकशीची मागणी केली आहे.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादक - सागर काशिनाथ ओतारी **(मोबा.- ९९७००५३०६६)** व मालक रेखाबाई काशिनाथ ओतारी यांनी श्री समर्थ कृपा डिजिटल प्रिंटर्स, पी -३३, औद्योगिक वसाहत शॉपिंग कॉम्प्लेक्स, जुनी एमआयडीसी, जळगाव -४२५००१ येथे छापून शॉप नं. ई-१२, चौथा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव- ४२५००१ (महाराष्ट्र), येथे प्रसिद्ध केले.
**✲ कार्यकारी संपादक - किशोर शंकर शिंपी** (✲ पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील) (RNI-MAHMAR/2023/89125) कार्यालय दूरध्वनी क्र. : ०२५७-२२२४०६६, E-Mail : shauryamarathi@gmail.com

# ४० टक्के क्षेत्रावरील केळी,ऊस,पपईच्या बागा धोक्यात

## पाडळसरे-कळमसरे-निम गावावर हवामानाची अवकृपा, उन्हाच्या तडाख्यात केळी बागा लागल्या सुकू

प्रतिनिधी । अमळनेर

**गेल्या एक महिन्यांपासून उन्हाचा पारा दिवसागणिक वाढत आहे. त्यामुळे या भागातील तापमानाचा पारा ४० अंशावर पोहचला असून पाडळसरे परिसरातील नीम, कळमसरे, बोहरे, कलाली, वासरे, खेडी, शहापूर, हिंगोने, दोधवद, मारवड, खर्दे, शहापूर, भिलाली आदी जवळपासच्या गावातील शेकडो बागायती क्षेत्र केळी, ऊस, पपई बागा तप्त उन्हामुळे होरपळत असून काही बागा सुकू लागल्या आहेत. तप्त ऊन आणि गरम जोरदार वारे वाहत असल्याने पाडळसरे परिसरातील शेत शिवारात पाण्याची भूजल पातळी कमालीची खालावली आहे. तसेच अनेक कूपनलिका व विहिरी आटण्याच्या मार्गावर आहेत तर बहुतेक आटल्या आहेत.**


(छाया : अजय भामरे)

पाडळसरे परिसरातील बोहरे, कलाली, नीम, कळमसरे, दोधवद, हिंगोणे, शहापूर, मारवड, तांदळी आदी पांझरा तापीनदी परिसरातील शेतशिवारात जवळपास २८५ एकर केळी, २०८ एकर ऊस, ७३ एकरवर पपईसह उन्हाळी भुईमूग, मका, बाजरी आदी पिकांची लागवड केलेली असल्याचा प्राथमिक अंदाज कृषी विभागाचे सुभाष पाटील यांनी वर्तवला आहे. त्यातील निम्म्याहून अधिक क्षेत्रातील केळी बागा पाण्याची कमतरतेमुळे व कडक तापमानासह गरम वाहणाऱ्या जोरदार वाऱ्यामुळे केळीचे झाड घडासह सुकून मोडून पडत आहेत. यामुळे आज निम्म्या क्षेत्रातील केळी बागा वाया गेल्या असून या उन्हाचा तडाखा ऊस, पपई आणि उन्हाळी हंगामातील भुईमूग आदी पिकांनाही जाणवू लागला आहे, असे केळी बागायतदार शेतकरी विकास पाटील यांनी दै. 'शौर्य मराठी'शी बोलतांना सांगितले.

तापी नदीवरील पाडळसरे धरणातील जलसाठाही मृत अवस्थेत असल्याने केळी बागांना पाणी आणायचे कोठून अशी चिंता बागायदार शेतकऱ्यांना भेडसावत आहे. कडक उन्हामुळे पाण्याची कमतरता भासत असून अनेक केळी झाडावरील घड झाडासकट सुकून गेले असून शेकडो एकर केळी पिकांचे उत्पादन खर्चही निघणार नाही. त्यामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत.

पाडळसरे परिसरातील शेतशिवारात पावसाची अवकृपाच नेहमीच जाणवत असून सलग चार वर्षे झाली असून दुष्काळी झळा सोसून कमी पाण्यावर व तापी नदीवरील पाण्याच्या भरवशावर आणि दुष्काळावर मात करण्याचा शेतकरी प्रयत्न करीत असताना कडक उन्हाळ्याचा फटका या बागायतीला क्षेत्राला बसत असल्याने शेतकरी हवालदिल झाला आहे. यावर्षी तापी नदीला फक्त एक पूर जेमतेम आला होता. मात्र यावर्षी तापीनदी व धरणातील पाणी साठाही कमी झाल्याने बागायदार शेतकऱ्यांवर जलसंकट ओढवले आहे. यात जवळपास १० किमी परिसरातील ऊस, केळी, पपई, उन्हाळी भुईमूगसह बहूवार्षिक पिके डाळिंब, पेरू, चिकू आदी फळबागाची अनेक झाडे ही कोमेजून सुकून गेली आहेत. त्यात सर्वाधिक फटका केळी बागांना बसत असून बागायती क्षेत्र वाचविणे कठीण जात आहे.

### पांझरा, अनेर नदीत आवर्तन सोडण्याची अपेक्षा

तापी नदीवरील पाडळसरे धरणातील जलसाठ्यातच परवाने घेऊन उपसासिंचन पद्धतीने शेतीसाठी वापर करून कोरडवाहू शेतात बागायत पिके शेतकरी घेऊ लागला आहे. मात्र,एप्रिल महिन्यातच मे हिटचा तडाखा जाणवू लागला आहे. जोरदार गरम हवा आणि तप्त उन यामुळेच केळी पिकाची कोवळी पाने फाटून तसेच उष्ण लाटेमुळे फाटलेली पाने सुकून याचा परिणाम केळीचा झाडावर होऊन केळी बागा सुकू लागल्या आहेत. यामुळे केळी बागायतदार शेतकरी हवालदिल झाले आहेत. पांझरा नदीत व अनेरसह तापीत आवर्तनाचे पाणी सोडल्यास या पाण्याचा फायदा होऊन अनेक विहीर व कूपनलिकांची जलपातळी टिकून राहण्यासाठी मदत होईल. त्यामुळे काही प्रमाणात केळी झाडाची पाण्याची तृष्णा भागण्यास मदत होईल व नवीन पालवी पोगे यायला सुरुवात होईल. तेव्हाच केळी बागा सुधारतील. या कठिण प्रसंगात सावरण्यासाठी तापी, पांझरा व अनेर नदीत आवर्तन सोडण्याची अपेक्षा शेतकरी वर्ग करीत आहेत.

## थोडक्यात



### संत ज्ञानेश्वर विद्यालयात सूचना पेटी उपक्रम सुरू

**जळगाव ।** श्री संत ज्ञानेश्वर प्राथमिक व माध्यमिक विद्यालयात विद्यार्थ्यांचे व पालकांचे मत जाणून घेण्यासाठी सूचना पेटी हा अभिनव उपक्रम सुरू करण्यात आला आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून शाळेच्या प्रगतीसाठी उपयुक्त सूचना, तक्रारी व विविध कल्पना संकलित केल्या जाणार आहेत. विद्यार्थ्यांना कोणतीही भीती न बाळगता आपले विचार मांडता यावेत तसेच पालकांनाही शाळेच्या कार्यपद्धतीबाबत आपले मत व्यक्त करण्याची संधी मिळावी, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे, असे मुख्याध्यापक मुकेश नाईक यांनी सांगितले.

### भगवान श्री परशुराम पालखी उत्सव शनिवारी


**जळगाव ।** ब्रह्मश्री बहुउद्देशीय संस्था सर्व शाखिय ब्राह्मण समाज जळगावतर्फे दरवर्षीप्रमाणे या वर्षीही भगवान श्री परशुराम पालखीत्सव उत्साहात साजरा होत आहे. दि.१८ एप्रिल रोजी सायंकाळी ५ वाजता हनुमान मंदिर निवृत्तीनगर येथून भव्य पालखी सोहळा निघेल. सप्तशृंगी मंदिर प्रेमनगर येथे मान्यवरांच्या हस्ते पूजा, आरती व प्रबोधन होईल. दि. १९ एप्रिल रोजी अक्षय तृतीया असून सकाळी ७ वाजता सप्तशृंगी मंदिर येथे भगवान परशुरामांचा अभिषेक, पूजा व आरती संपन्न होईल. आमचे स्वयंसेवक आपल्यापर्यंत पोहोचतीलच, तरीही हेच अधिकृत निमंत्रण समजून सर्वांनी उपस्थित राहावे. आपल्या सहभागातून ब्राह्मण एकता वाढवूया, असे आवाहन अध्यक्ष प्रसाद पटवे व समस्त ब्रह्मश्री परिवार यांनी केले आहे.

## महापौरांच्या पुढाकाराने शहराच्या सुशोभीकरणाला वेग

### मुख्य रस्त्यांवर व्हाईट पट्ट्यांसह पिवळ्या पट्ट्यांच्या कामाला सुरुवात

प्रतिनिधी । जळगाव

**जळगाव शहराला शिस्तबद्ध आणि सुंदर स्वरूप देण्यासाठी महापौर दीपमाला काळे यांनी सुरू केलेल्या विशेष मोहिमेला आता यश येताना दिसत आहे. महापौर आणि सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्यातील प्रभावी समन्वयामुळे शहरात रस्ते विभाजक आणि मार्गांवर पांढरे व पिवळे पट्टे (झेंब्रा क्रॉसिंग व लेन मार्किंग) टाकण्याच्या कामाला दि. १२ एप्रिल रोजी रात्री ९ वाजेपासून प्रत्यक्ष सुरुवात करण्यात आली आहे.**



रविवारी रात्री उशिरा सुरू झालेल्या या कामात पहिल्या टप्प्यात शिवतीर्थ चौक ते आकाशवाणी चौक या मुख्य मार्गावर पांढरे पट्टे टाकण्याचे काम युद्धपातळीवर सुरू करण्यात आले आहे. रात्रीच्या वेळी वाहतूक कमी असताना हे काम करण्यात आल्याने कामाचा वेग वाढला असून, सोमवारी सकाळी या मार्गाचे रूप पालटल्याचे पाहायला मिळाले. यावेळी महापौर दीपमाला काळे, उपमहापौर मनोज चौधरी, स्थायी समिती सभापती डॉ.चंद्रशेखर पाटील यांनी रात्री प्रत्यक्ष कामाची पाहणी केली. संबंधित कंत्राटदार आणि कर्मचाऱ्यांशी चर्चा करून कामाविषयी सूचना केल्या.

शहरातील वाढती वाहतूक आणि अपघातांचे प्रमाण लक्षात घेता, रस्ते मार्किंग असणे अत्यंत आवश्यक होते. गेल्या महिनाभरापासून महापौर दीपमाला काळे यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे या कामासाठी सातत्याने पाठपुरावा केला होता. रस्त्यांवर पट्टे टाकल्यामुळे वाहनधारकांना आपल्या लेनचा अंदाज येईल. ज्यामुळे वाहतुकीला शिस्त लागेल आणि रस्ते अधिक सुरक्षित व सुंदर दिसण्यास मदत होणार आहे.

## समता सप्ताहानिमित्त जळगावात विविध कार्यक्रमांचे आयोजन

प्रतिनिधी । जळगाव

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त दि. ८ ते १४ एप्रिल २०२६ या कालावधीत सामाजिक समता सप्ताह उत्साहात साजरा करण्यात येत आहे. या निमित्ताने दि. १४ एप्रिल रोजी सकाळी १० वाजता जिल्हा नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय, जळगाव येथे अभिवादन कार्यक्रम व कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबळीकरण व स्वाभिमान मेळावा आयोजित करण्यात आला आहे.

## रेती माफियाचा कहर! डंपरने ज्येष्ठ नागरिकास उडवले

प्रतिनिधी । अमळनेर

**शहरातील तहसील कार्यालयासमोर सायंकाळी बेकायदेशीररीत्या रेतीने भरलेल्या डंपरने एका ज्येष्ठ नागरिकास जोरदार धडक दिली. अपघाताची माहिती वाऱ्यासारखी पसरताच घटनास्थळी नागरिकांची मोठी गर्दी उसळली होती. काही वेळासाठी परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.**



पोलीस प्रशासन तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी परिस्थिती नियंत्रणात आणत वाहतूक सुरळीत केली. जखमी नागरिकास तात्काळ उपचारासाठी हलविण्यात आले. नागरिकांमध्ये मात्र संतापाची लाट उसळली असून अशा बेफाम वाहनचालकांवर कठोर कारवाईची मागणी जोर धरू लागली आहे. या घटनेमुळे अमळनेर शहरात बेकायदेशीर वाळू वाहतुकीचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे.

## मॅरेथॉन स्पर्धेत तेजस सपकाळे तर महिला गटात उन्नती पाटील प्रथम

प्रतिनिधी । अमळनेर

**शहरात क्रांतिसूर्य महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संयुक्त जयंती महोत्सवानिमित्त आयोजित करण्यात आलेली भव्य मॅरेथॉन स्पर्धा उत्साहात पार पडली.या स्पर्धेत शहरासह परिसरातील अनेक धावपटूंनी सहभाग नोंदवून सामाजिक ऐक्य व आरोग्याचा संदेश दिला.**

या स्पर्धेचे उद्घाटन आ. अनिल पाटील यांच्याहस्ते करण्यात आले.



यावेळी अमळनेरचे पोलीस निरीक्षक दत्तात्रय निकम, पोलिस कॉन्स्टेबल काकडे, विनोद संदानशिव, सिद्धार्थ शिसोदे, किरण पाटील व इतर मान्यवर उपस्थित होते. सकाळच्या उत्साही वातावरणात सुरू झालेल्या या मॅरेथॉनमध्ये युवक, युवती यासह विविध वयोगटातील नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. पुरुष गटात तेसज सपकाळे (नाशिक) याने उत्कृष्ट कामगिरी करत प्रथम क्रमांक पटकावला. ऋषिकेश वारुडे (नाशिक) याने द्वितीय तर खुमानसिंग ठाकरे (धडगाव, जि.नंदुरबार) याने तृतीय क्रमांक पटकावला. महिला गटात स्पर्धकांनी उल्लेखनीय कामगिरी केली. उन्नती पाटील यांनी प्रथम क्रमांक मिळवला, तर आरती पाटील यांनी द्वितीय आणि ज्योती महाजन यांनी तृतीय क्रमांक पटकावला. विजेत्यांना रोख बक्षीस देण्यात आले. यावेळी नरेंद्र संदानशिव, अविनाश संदानशिव, गौतम मोरे, देवदत्त संदानशिव, सुनील वाघ, सुनील करंदीकर, गोपीचंद चव्हाण, राहुल संदानशिव, श्रीचंद चव्हाण, सतीश सोनवणे, ज्ञानेश्वर संदानशिव, गोकुळ बिऱ्हाडे, प्रा.कृष्णा संदानशिव, नितीन संदानशिव, स्वप्नील पाटील, भिका संदानशिव उपस्थित होते.

## बचतगटांच्या महिलांसाठी मार्जिन मनी कार्यशाळा उत्साहात

प्रतिनिधी । जळगाव

**समता सप्ताहानिमित्त समाज कल्याण विभाग व इतर मागास बहुजन कल्याण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित मार्जिन मनी कार्यशाळा व महिला मेळावा उत्साहात पार पडला.**

क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या द्विशताब्दी जयंती वर्षानिमित्त आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर समता सप्ताहाच्या औचित्याने हा स्तुत्य उपक्रम राबविण्यात आला.



कार्यक्रमाला बचतगटातील महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. कार्यक्रमात बँक ऑफ महाराष्ट्रच्या प्रोबेशनरी ऑफिसर वृषाली चौरे यांनी अत्यंत सामान्य परिस्थितीतून अधिकारी पदापर्यंतचा प्रेरणादायी प्रवास उलगडत महिलांना आत्मविश्वासाचा संदेश दिला. सेंट्रल बँक ऑफ इंडिया, जळगावचे धीरज श्रीनिवास पाटील यांनी स्टँड अप इंडिया योजनेची सविस्तर माहिती देत कर्ज प्रक्रियेतील सुलभता स्पष्ट केली. बँक सखी रंजना सोनवणे यांनी आपल्या अनुभवातून महिलांना होणाऱ्या फायद्यांवर प्रकाश टाकला. तसेच जिल्हा उद्योग केंद्राचे उद्योग निरीक्षक ल. गो. तावडे यांनी मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम व नवउद्योगांच्या संधींबाबत मार्गदर्शन केले. यावेळी सहाय्यक आयुक्त योगेश पाटील यांच्या हस्ते बचतगटातील महिलांना भारतीय संविधानाची उद्देशिका व महात्मा फुले यांचे समग्र वाङ्मय पुस्तके भेट देऊन गौरविण्यात आले. महिलांची केवळ आर्थिक नव्हे तर वैचारिक प्रगती व्हावी, हा या उपक्रमामागील उदात्त हेतू असल्याचे त्यांनी नमूद केले. यावेळी विशेष अधिकारी समाज कल्याण अमोल कुलकर्णी, विशाल राठोड, राजेंद्र कांबळे, अजय ठाकूर व कर्मचारी उपस्थित होते.

## महाराष्ट्र लोकसेवा आयोग परीक्षेत अमळनेरच्या भीम कन्येची उंच भरारी

प्रतिनिधी । अमळनेर

**येथील कु.आकांक्षा जितेंद्र मोरे या भीम कन्येने महाराष्ट्र लोकसेवा आयोग परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करत महसूल सहाय्यक पदावर तिची निवड झाली आहे. तिच्या या यशामुळे संपूर्ण अमळनेर नगरीत आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.**



महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत आकांक्षा जितेंद्र मोरे ही सामान्य कुटुंबातून येत अत्यंत मेहनत, चिकाटी आणि जिद्दीच्या जोरावर आकांक्षा मोरे हिने हे यश मिळवले आहे. स्पर्धा परीक्षेच्या कठीण प्रवासात तिने सातत्याने अभ्यास करून आपल्या ध्येयाकडे वाटचाल केली. तिच्या या यशामागे कुटुंबीयांचे पाठबळ, मार्गदर्शकांचे मार्गदर्शन आणि स्वतः ची प्रबळ इच्छाशक्ती हे घटक महत्त्वाचे ठरले. आकांक्षा मोरे हिच्या निवडीमुळे अमळनेर शहरासह बौद्ध समाजामध्ये विशेष आनंदाचे वातावरण आहे. सर्व स्तरांतून तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. तिच्या या यशाने इतर तरुण-तरुणींनाही प्रेरणा मिळणार असल्याची भावना व्यक्त होत आहे.

## दोन लाखांहून अधिक लखपती दीदी योजनेत जळगाव जिल्ह्याची उत्कृष्ट कामगिरी

प्रतिनिधी । जळगाव

**केंद्र व राज्य शासनाच्या निर्देशानुसार जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, जळगाव यांच्यामार्फत राबविण्यात येत असलेल्या लखपती दीदी उपक्रमांतर्गत गेल्या दोन वर्षांच्या कालावधीत जिल्ह्यात दोन लाखांहून अधिक महिलांची लखपती दीदी म्हणून तयार झाल्या आहेत.**



या उपक्रमाचा उद्देश ग्रामीण भागातील महिला तसेच स्वयं सहायता बचत गटातील सदस्यांना स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे, त्यांना आवश्यक प्रशिक्षण व आर्थिक सहाय्य प्रदान करणे आणि त्यांच्याकडून वार्षिक किमान एक लाख रुपयांचे उत्पन्न प्राप्त होईल याची हमी देणे हा आहे. या योजनेंतर्गत महिलांना विविध लघुउद्योग, गृहउद्योग तसेच उत्पादनाधारित व्यवसायासाठी प्रोत्साहन देण्यात येत आहे.

वित्तीय वर्ष २०२४-२५ मध्ये जिल्ह्यास १,००,००० महिलांना लखपती दीदी बनविण्याचे उद्दिष्ट निर्धारित करण्यात आले होते. त्यानुसार प्रत्यक्षात १,०६,०७८ महिलांनी उद्दिष्टापेक्षा अधिक यश संपादन केले असून, त्यांना सुमारे रुपये ५०० कोटी इतक्या कर्जाचे वितरण करण्यात आले आहे. तसेच वित्तीय वर्ष २०२५-२६ मध्ये १,११,००० महिलांचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले असून, ते उद्दिष्ट पूर्णत्वास नेण्यात आले आहे. या वर्षाकरिता देखील सुमारे रुपये ७५० कोटी कर्ज रक्कम मंजूर असून, संबंधित लाभार्थ्यांच्या खात्यात अर्थ सहाय्य वर्ग करण्याची कार्यवाही प्रगतिपथावर आहे. या योजनेअंतर्गत महिलांकडून पारंपरिक उत्पादनांबरोबरच विविध अभिनव व मूल्यवर्धित वस्तूंची निर्मिती करण्यात येत असून, त्यांच्या उत्पादनांना राज्यांतर्गत तसेच आंतरराज्यीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर मागणी निर्माण झालेली आहे. त्यामुळे महिलांना घरबसल्या रोजगार उपलब्ध होऊन त्यांच्या आर्थिक सक्षमीकरणास चालना मिळत आहे.

### महिलांचे आर्थिक, सामाजिक सक्षमीकरण

जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक राजू लोखंडे यांनी कळविले आहे की, स्वयं सहायता गटांना कमी व्याजदराने कर्ज उपलब्ध करून देत त्यांना व्यवसाय उभारणीसाठी आवश्यक सहाय्य करण्यात येत आहे. योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीमुळे ग्रामीण भागात स्वयंरोजगाराच्या संधी वाढीस लागून महिलांचे आर्थिक व सामाजिक सक्षमीकरण साध्य होत आहे,अशी माहिती जळगाव जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक राजू लोखंडे यांनी दिली आहे.

## सार्वजनिक जयंती महोत्सवात ४२ मंडळांचा राहणार सहभाग

प्रतिनिधी । जळगाव

**भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीतर्फे दि. १४ एप्रिल रोजी सायं. ५ वाजता सार्वजनिक मिरवणूक काढण्यात येणार आहे. या मिरवणुकीत विविध भागातील ४२ मंडळांचा सहभाग राहणार आहे.**

जळगाव शहर जयंती उत्सव समितीतर्फे डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त अभिवादन सभा दि. १४ एप्रिल रोजी सकाळी ९ वाजता मुकुंद सपकाळे यांच्या अध्यक्षतेखाली व आ.राजूमामा भोळे, माजी खासदार डॉ. उल्हास पाटील, जिल्हाधिकारी रोहन घुगे, जिल्हा पोलिस अधीक्षक महेश्वर रेड्डी, महापौर दीपमाला काळे, मनपा आयुक्त ज्ञानेश्वर ढेरे व अन्य मान्यवरांच्या उपस्थितीत रेल्वे स्टेशन परिसरातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याजवळ अभिवादन सभेचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमाला उपस्थितीचे आवाहन हरिश्चंद्र सोनवणे, प्रा.प्रीतीलाल पवार, प्रा.किसन हिरोळे, महेंद्र केदार व उत्सव समितीच्या पदाधिकाऱ्यांनी केले आहे. सायंकाळी विविध भागातून मिरवणुका काढण्यात येणार आहे. अनुचित प्रकार घडू नये,म्हणून पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात येणार आहे.

# लोणी खुर्द शिवारात भीषण आग; मका, ज्वारी जळून खाक

## पिकांचे मोठे नुकसान

प्रतिनिधी । पारोळा

तालुक्यातील लोणी खुर्द शिवारात लागलेल्या भीषण आगीत शेतकरी गंगाराम शामराव पाटील यांचे सुमारे दोन एकर क्षेत्रातील मका पिक पूर्णतः जळून खाक झाले. अचानक लागलेल्या या आगीमुळे परिसरात एकच खळबळ उडाली असून शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, गट क्रमांक १७० मधील शेतात उभे असलेले मका पीक काही क्षणांतच आगीच्या भक्ष्यस्थानी गेले. आग लागण्याचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसले, तरी वाऱ्याचा वेग अधिक असल्याने आगीने झपाट्याने फैलाव घेतला. स्थानिक नागरिकांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेत आग आटोक्यात आणण्याचा प्रयत्न केला. काही वेळाने आग नियंत्रणात आली, मात्र तोपर्यंत मोठे नुकसान झाले होते.

या घटनेमुळे शेतकरी गंगाराम पाटील यांचे मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान झाले असून, हातातोंडाशी आलेला घास हिरावल्याची भावना त्यांनी व्यक्त केली आहे. यंदा पिकाची स्थिती चांगली असतानाच ही दुर्घटना घडल्याने त्यांच्यावर अकस्मात संकट कोसळले आहे.





घटनास्थळी स्थानिक प्रशासन व महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांनी भेट देऊन पंचनामा करण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. तसेच, नुकसानग्रस्त शेतकऱ्याला तातडीने आर्थिक मदत देण्याची मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे. दरम्यान, वाढत्या उष्णतेमुळे शेतात आग लागण्याच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याचे चित्र आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी व नागरिकांनी अधिक सतर्क राहण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे.

## थोडक्यात

### तरसोदला १७ रोजी महाराजस्व समाधान शिबिर

**जळगाव ।** तालुक्यातील तरसोद येथे दि.१७ एप्रिल गुरुवार रोजी श्री गणपती मंदिर हॉल येथे सकाळी ९ वाजता छत्रपती शिवाजी महाराज समाधान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिराला जिल्हाधिकारी रोहन गुगे, अप्पर जिल्हाधिकारी श्रीमंत हारकर, उपविभागीय अधिकारी विनय गोसावी, तहसिलदार श्रीमती शीतल राजपूत यांची उपस्थिती लाभणार आहे. या शिबिरात विविध शासकीय लाभाचे वितरण, शैक्षणिक कामासाठी लागणारे महत्वाचे प्रमाणपत्र, ७/१२ दुरूस्ती, प्रलंबित फेरफार, भूसंपादन आदी महत्वाच्या बाबींची पुर्तता नागरिकांना करता येणार आहे. तरी ग्रामस्थ, विद्यार्थी, शेतकऱ्यांनी या शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन महसूल प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

### राज्यस्तरीय बालवैज्ञानिक स्पर्धेत अर्जुनला सुवर्णपदक

**पारोळा ।** येथील सेंट मेरी स्कूलचा इयत्ता सहावीतील विद्यार्थी व अर्जुन सायन्स अकॅडमीचा विद्यार्थी अर्जुन ज्ञानेश जोशी यांनी डॉ.होमी भाभा राज्यस्तरीय बालवैज्ञानिक स्पर्धा २५-२६ मध्ये सहभाग घेतला. मुंबईमध्ये दि.१२ एप्रिल रोजी झालेल्या पारितोषिक वितरण समारंभात अर्जुन जोशी यास नाशिक विभागांतर्गत प्रथम क्रमांक प्राप्त झाला. सुवर्णपदकाने मान्यवर अतिथींच्या हस्ते त्याला सन्मानित करण्यात आले. विज्ञान विषयातील त्याची समज नियमित सराव मार्गदर्शक शिक्षिका व त्याची आई सोनल जोशी यांच्या मार्गदर्शनाने त्याने हे यश संपादन केले. स्पर्धा परीक्षांसाठी फाउंडेशन बॅचेस नियमित सुरू असतात. त्याचा लाभ अर्जुनने घेतला. सेंट मेरी इंग्लिश मीडियम हायस्कूल मुख्याध्यापिका व शिक्षकांचे त्यास मार्गदर्शन लाभले.

## चोपडा येथे अखंड नाम जप यज्ञ सप्ताह

प्रतिनिधी । चोपडा

**येथील बजरंग नगरमधील स्वामी समर्थ केंद्रात श्री स्वामी समर्थ महाराज यांच्या पुण्यतिथी सप्ताहानिमित्त अखंड नाम जप यज्ञ सप्ताह उत्साहात संपन्न झाला आहे.**



या पार्श्वभूमीवर श्री गुरु चरित्र पारायण सोहळयास सुरुवात करण्यात आली आहे. एकूण ४०० सेवेकरी या पारायणात सहभागी झाले होते. सेवेकऱ्यांसाठी प्रहार सेवेचे नियोजन करण्यात आले होते. महिला सेवेकऱ्याची प्रहार सेवा सकाळी ६ ते सायंकाळी ६ या वेळेत व पुरुष सेवक-याची प्रहार सेवा सायंकाळी ६ ते सकाळी ६ या वेळेत सुरू आहे. श्री स्वामी समर्थ महाराजांच्या पुण्यतिथी सप्ताहनिमित्त भाविकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन सेवा केंद्राच्या वतीने करण्यात आले आहे.

दि. १५ रोजी सत्त दत्त पुजनाने सप्ताहाची सांगता होणार असून त्या दिवशी १०.३०वाजता नेवैद्य आरतीनंतर स्वामीच्या महा निर्माणच्या दिवशी घडलेल्या घटनांचे व १८ विभागातील काही विभागावर मार्गदर्शन होणार आहे. सप्ताह पार पाडण्यासाठी सर्व सेवेकऱ्याचे सहकार्य लाभले.

## सकल हिंदूंनी भगव्या झेंड्याखाली एकत्र येण्याची गरज : डॉ. खट्टर

प्रतिनिधी । यावल

**वेगवेगळ्या पंथाच्या वेगवेगळ्या झेंड्यांमुळे सकल हिंदू समाजामध्ये फूट पडण्याचे काम सुरू आहे. त्यासाठी सकल हिंदू धर्माच्या सर्व हिंदूंनी भगवा ध्वजाखाली एकत्र येण्याची गरज असून आपण सनातनी आहोत याचे भान सर्वांनी ठेवावे, असे प्रखरउद्गार सनातन महासंघ दिल्ली संस्थापक डॉ.गौतमजी खट्टर यांनी यावल येथे भुसावळ रस्त्यावरील श्री बालाजी मंदिराच्या समोरील पटांगणात श्री महर्षी व्यास नगरी हिंदू संमेलनात बोलताना व्यक्त केले.**

याप्रसंगी व्यासपीठावर श्री स्वामी ब्रह्मानंद श्री दत्त गिरणारी मठ भुसावळ स्वप्निल चौधरी, जळगाव जिल्हा राष्ट्रीय स्वयंसेवक संघ कार्यवाहक स्वामी स्वरूपानंद महाराज श्रीक्षेत्र डोंगरदे आणि यावल तालुका सकल हिंदू समाजाध्यक्ष निलेश बारी हे उपस्थित होते. वेगवेगळ्या जातीपंथाच्या व वेगवेगळ्या पक्षाच्या लोकांनी सनातन धर्मामध्ये फूट पाडण्याचे काम सुरू केलेले आहे. सनातन धर्म भयमुक्त होण्यासाठी जातीयवाद, प्रांतवाद, क्षेत्रवाद, भाषावाद, परिवारवाद, धनवाद आणि उच-नीच वाद हा दूर सारून सर्व हिंदूंनी एका झेंड्याखाली यावे, असे आवाहन डॉ.खट्टर यांनी केले आहे.

## विवेकानंद विद्यालयाची कु.स्वरा हरताळकर इंग्लिश ग्रामर ॲडव्हान्स परीक्षेत राज्यातून सर्वप्रथम

प्रतिनिधी । चोपडा

**पुणे येथील टिळक महाराष्ट्र विद्यापीठातर्फे आयोजित इंग्लिश ग्रामर ॲडव्हान्स फेब्रुवारी २०२६ या राज्यस्तरीय परीक्षेत विवेकानंद विद्यालयाची विद्यार्थिनी कु. स्वरा विनीत हडताळकर हिने शेकडा ७८ टक्के गुण मिळवत राज्यातून प्रथम येण्याच मान मिळविला आहे.**



स्वरा हरताळकर ही इयत्ता दहावी वर्गात शिकत असून तिने टिळक विद्यापीठातर्फे घेण्यात आलेल्या या स्पर्धेत १०० पैकी ७८ गुण मिळवत राज्यातून प्रथम क्रमांक पटकावला आहे. याआधीही तिने विविध स्पर्धांमध्ये नैपुण्य दाखवत तालुका, जिल्ह्यात व राज्यात चमकण्यात कसर सोडलेली नाही . नंबर एक ही तिची छबी असून हवाई सफरचा मान तिने पटकाविला होता. तिला विद्यालयाचे इंग्रजी विषयाचे शिक्षक व या स्पर्धेचे कामकाज बघणारे उपशिक्षक प्रसाद वैद्य यांचे बहुमोल असे मार्गदर्शन मिळाले. कु. स्वरा हिचे संस्थेचे अध्यक्ष डॉ. विकास हरताळकर ,उपाध्यक्ष घनश्याम अग्रवाल, डॉ.अमित हरताळकर ,ज्योत्स्ना हरताळकर, नरेंद्र भावे ,पवन लाठी, आशा चित्ते ,रेवती दीक्षित, योगिता केंगे , संजय सोनवणे यांच्यासह सर्व शिक्षक वृंदांनी अभिनंदन केले.

## आठ वर्षाच्या मुलाच्या गाठीच्या शस्त्रक्रियाकामी आरोग्य मित्राच्या प्रयत्नांना यश

प्रतिनिधी । चोपडा

**तालुक्यातील देवगड येथील आदिवासी कुटुंबातील समीर बारेला या १३ वर्षीय शाळकरी मुलाच्या कमरेत कॅन्सरसारखी गाठ निर्माण झाल्यामुळे त्याला चालणेही बंद झाले होते. खाजगी रुग्णालयात २ ते ३ लाखांचा खर्च त्यांना परवडणारा नव्हता. यावेळी आरोग्य मित्राच्या प्रयत्नामुळे ऑपरेशन सुखरुप झाले.**



आदिवासी भागात आरोग्य मित्र म्हणून काम करीत असलेले तथा कर्जाणे गावाचे उपसरपंच प्रमोद बारेला यांच्याशी संपर्क साधला. परिस्थितीची गंभीरता लक्षात घेऊन त्यांनी तत्काळ पुढाकार घेतला. आवश्यक कागदपत्रे जसे की रेशन कार्ड आणि आयुष्यमान कार्ड तातडीने तयार करून दिले. त्यानंतर त्यांनी धुळे येथील अजमेरा मेडिकल कॉलेज सत्ययुग खाजगी रुग्णालयात संपर्क साधून डॉ. सागर पाटील (न्यूरो सर्जन) यांच्याशी चर्चा केली. डॉक्टरांनीही परिस्थिती वर होकार दिला. आणि या गरीब मुलावर आयुष्मान योजनेत मोफत शस्त्रक्रिया करण्यास सहमती दर्शवली. वेळेत उपचार मिळाल्यामुळे मुलाची यशस्वी शस्त्रक्रिया झाली आणि तो पूर्णपणे बरा होऊन आज सुखरूप घरी परतला आहे. आरोग्य मित्र बारेला यांचे कौतुक होत आहे.

## अमळनेरात मोकाट जनावरांचा प्रश्न गंभीर; बजरंग दलाचे निवेदन

प्रतिनिधी । अमळनेर

**शहरात मोकाट जनावरांचा सुळसुळाट आणि वाढत्या जनावरे चोरीच्या घटनांमुळे नागरिक हैराण झाले आहेत. या प्रश्नाकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी विश्व हिंदू परिषद बजरंग दलाच्या वतीने पोलीस निरीक्षक आणि मुख्याधिकारी यांना निवेदन देण्यात आले.**

प्रशासनाला दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, शहरातील सार्वजनिक रस्त्यांवर मोकाट गायी, वासरांना जन्म देत असून, या लहान वासरांवर भटक्या कुत्र्यांकडून हल्ले होत आहेत. गेल्या आठवडाभरात अशा घटनांमध्ये ५ वासरांचा मृत्यू झाला आहे. जनावरे चोरीच्या वाढत्या घटनांमुळे पशुपालकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. प्रशासनाने या निवेदनाची दखल घेऊन तत्काळ उपाययोजना कराव्यात, अशी मागणी निवेदनाव्दारे करण्यात आली आहे. निवेदनावर बजरंग दलाचे संजय शहा, सचिन चौधरी, सचिन महाजन, नरेश पाटील, नरेश आहुजा, योगराज चव्हाण, पवन बुरी, विजय गंभीर वारी, अमोल उत्तम महाजन, विजय धनराज पाटील, आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## धरणगाव रेल्वे स्टेशन विकासासाठी सकारात्मक बैठक

### नवीन गाड्यांचे थांबे व सुविधा वाढीची मागणी

प्रतिनिधी । धरणगाव

**धरणगाव रेल्वे स्टेशनच्या सर्वांगीण विकासासाठी तसेच प्रवाशांच्या सोयी-सुविधांमध्ये वाढ करण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण बैठक पश्चिम रेल्वे मुख्यालयात पार पडली. डीआरयूसीसी (पश्चिम रेल्वे) सदस्य तथा धरणगाव तालुका प्रवासी मंडळाचे अध्यक्ष महेंद्र कोठारी यांनी, खा. स्मिता वाघ यांच्या मार्गदर्शनाखाली ही बैठक घेतली.**



या बैठकीत मुख्य वाणिज्य प्रबंधक स्वप्नील वालिंजकर तसेच विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत सविस्तर चर्चा करण्यात आली. धरणगाव स्टेशनच्या विकासासाठी आणि प्रवाशांच्या अडचणी दूर करण्यासाठी विविध महत्त्वाच्या मागण्या मांडण्यात आल्या. या सर्व मागण्यांवर अधिकाऱ्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिल्याचे सांगण्यात आले. धरणगाव येथे खालील महत्त्वाच्या गाड्यांना थांबा देण्याची मागणी करण्यात आली. त्याचप्रमाणे १९५५९/६० ओखा-तिरुपती एक्सप्रेस, २०६२५/२६ चेन्नई-भगत की कोठी एक्सप्रेस, ०६१८१ कोयंबतूर-जयपूर स्पेशल, ०९०६५/६६ सुरत-छपरा स्पेशल, ०९०३१/३२ उधना-हसनपूर स्पेशल, १९१०५/०६ उधना-भुसावळ मेमोला भोणे स्टेशन येथे थांबा मिळावा. ०७०६१/६२ हैदराबाद-भावनगर स्पेशल, ०९०५९/६० उधना-खुर्दा रोड स्पेशल बंद गाडी सुरू करणे. नवीन तिकीट इमारतीजवळ फूट ओव्हर ब्रिज (ऋजइ) उभारणे, आरपीएफ (रेल्वे सुरक्षा दल) कार्यालय सुरू करून स्टेशन विकासासह, डब्यांची वाढ करणे. तसेच २०९२५/२६ अमरावती एक्सप्रेसमध्ये ५ डबे वाढवणे किंवा २०डब्यांसह चालवणे, १९००५/०६ गाडीत ३ अतिरिक्त डबे जोडणे. यासह धरणगाव रेल्वे स्टेशनच्या विकासासाठी आणि प्रवासी सुविधांमध्ये वाढ करण्यासाठी ही बैठक सकारात्मक ठरली अ सर्व मागण्यांवर लवकरच कार्यवाही होईल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

## चोपड्यात उद्या जागतिक केळी दिवस साजरा होणार : डॉ. निकम

### • या कार्यक्रमास शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे केले आहे आवाहन

प्रतिनिधी । चोपडा

**शेतकरी केळी पिकवतो परंतु त्याचा आहारामध्ये समावेश करीत नाही. परंतु आरोग्यासाठी केळी प्रत्येकाने खावी. जळगाव जिल्हा हा सर्वांत जास्त केळीचे उत्पादन घेणारा जिल्हा आहे. केळी पीक हे खान्देशचे वैभव आहे. आजही समाजात केळीबाबत समज, गैरसमज आहेत.**

चोपडा तालुक्यात केळीवर प्रक्रिया करणारा एक ही उद्योग उभा राहिला नाही, अशी खंत व्यक्त करून आरोग्यासाठी केळी पौष्टीक फळ असून, त्याचा दैनंदिन आहारात वापर झाला पाहिजे. यासाठी केळीचे महत्व शासनासह समाजाला पटवून देण्यासाठी दि.१५ एप्रिल रोजी शहरात जागतिक केळी दिवस साजरा होणार आहे, अशी माहिती आदर्श शेतकरी डॉ.रविंद्र निकम यांनी पत्रकार परिषदेत दिली. जागतिक केळी दिनाच्या निमित्ताने शासकीय विश्रामगृहावर पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी आदर्श शेतकरी डॉ. रविंद्र निकम, डॉ. सुभाष देसाई (चोपडा) अंबादास पाटील (आडगाव), मोहन पाटील (तावसे खुर्द), यतीन ठाकरे (मंगरुळ) अजय पाटील (रुखणखेडे), जीवन पाटील



(गोरगावले बु.), अनिल पाटील (कुसुंबे), गोरख पाटील (पाळधी) आदी शेतकरी उपस्थित होते. यावेळी डॉ. रविंद्र निकम पुढे म्हणाले की, १५ एप्रिल रोजी जागतिक केळी दिवस साजरा करण्यात येणार आहे. केळी खाण्या विषयीचे गैरसमज दूर व्हावेत, आहारात केळी खाण्याचे प्रमाण वाढावे, तसेच आरोग्यदायी केळीचे महत्त्व आणि फायदे यावर तज्ञांच्या मार्गदर्शनाने समाज प्रबोधन केले जाणार आहे. दि.१५ रोजी सकाळी ८ वाजता ग्रामीण पोलीस स्टेशनजवळ केळी घडाचे पूजन करण्यात येऊन मिरवणुकीस सुरुवात होणार आहे.

**जागतिक केळी दिनाच्या कार्यक्रमाला चोपडा तालुक्यातील शेतकरी व नागरिकांनी उपस्थिती द्यावी, असे आवाहन जागतिक केळी दिवस आयोजन समिती व केळी उत्पादक शेतकरी यांनी केली आहे.**




## डॉ. आंबेडकर जयंतीनिमित्त शाळेत प्रेरणादायी चित्रफलक

प्रतिनिधी । चोपडा

डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त शाळेत प्रेरणादायी चित्रफलकाचे सादरीकरण वर्डी येथील माध्यमिक विद्यालयात एक अनोखा व प्रेरणादायी चित्रफलकामध्ये डॉ. आंबेडकर यांचे आकर्षक व्यक्तिचित्र रेखाटण्यात आले आहे. फलकावर आंबेडकरांची सही दर्शवून चित्राला अधिक वास्तवता आणि प्रभाव देण्यात आला आहे. हा सुंदर चित्रफलक शाळेचे कलाशिक्षक भूषण सानप यांनी साकारला आहे. या उपक्रमाचे मुख्याध्यापक मोहन चव्हाण तसेच पर्यवेक्षक आर. बी. साळुंखे यांनी विशेष कौतुक केले आहे.